<u>सन २०१७-१८ या कालावधीसाठी</u>
<u>विभागास दिलेली KRA उद्दिष्टये.</u>

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्र. KRA २०१७/प्र.क्र.(१०१/१७)/एसडी-६
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२
दिनांक: २५ सप्टेंबर, २०१७.

<u>परिपत्रक</u>-

सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी शालेय शिक्षण विभागासाठी सन २०१७-१८ या कालावधीसाठी खालील प्रमाणे Key Result Area (KRA) उद्दिष्टे दिली असून राज्याला राष्ट्रीय पातळीवर होणा-या शैक्षणिक गुणवत्तेत प्रथम तीन राज्यात आणणे व दहावी पर्यंत मुलींच्या गळतीचे प्रमाण ५% च्या खाली आणणे ही प्रमुख उद्दिष्टे आहेत. ही उद्दिष्टे साध्य करण्याकरिता राज्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा कार्यक्रम आखण्यात आला असून त्यानुसार प्राथमिक स्तरासाठी दि.२२ जून, २०१५ व माध्यमिक स्तरासाठी दि.१६ सप्टेंबर, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. उपरोक्त शासन निर्णयांच्या अनुषंगाने विभागास या वर्षी दिलेल्या उद्दीष्टांची पूर्तता करण्याच्या अनुषंगाने सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी नियोजनबध्द व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.

१. सन २०१६-१७ चे खाली नमूद केलेले अपूर्ण केआरए पूर्ण करणे.
   (अ) निवडक खेळ/क्रीडा सुविधांचा दर्जा स्थानिक लोकप्रियतेनुसार उन्नत करणे. (Sport Mapping)
   (ब) शासन अनुदानित शाळेतील शिक्षकांची भरती CET द्वारे करणे.
२. खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेशा संदर्भात विद्यार्थी व पालक यांना त्रास न होता संपूर्ण प्रक्रीया ही पारदर्शक Digital पध्दतीने व सुलभपणे होण्याकरीता योग्य ते नियोजन करुन सुधारणा करणे.
३. ASER evaluation प्रमाणे सर्व जिल्हे सातारा जिल्हयाच्या २०१६ च्या मानांकनानुसार आणणे.
४. वर्षात ४ बाहय परीक्षा/चाचणी घेऊन पालकांना कळविणे.
५. इयत्ता १ ली ते १० वी तील विदयार्थ्यांच्या मुलभूत क्षमता विकसित करणे.
६. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत ७५ टक्के प्राथमिक शाळांना प्रगत करणे.
७. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत ५०टक्के उच्च प्राथमिक शाळांना प्रगत करणे.
८. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत माध्यमिक स्तर शाळांना प्रगत करणे.
९. A ग्रेड मध्ये नसलेल्या शाळांनी किमान एक श्रेणी वाढ करणे. तसेच ३३% शाळा "A" ग्रेड मध्ये आणणे.
१०. इयत्ता नववी ते दहावीमधील विद्यार्थ्याचे गळतीचे प्रमाण मागील वर्षाच्या तुलनेत ५०% नी कमी करणे.
११. सर्व शाळा डिजिटल करणे (१००%)
१२. २५% शाळांमध्ये Bio Matrix लागू करणे. (Thump impression/Facial Recognition)
१३. शालेय परिसरातील मुले लांबच्या शाळेत शिकायला जातात अशा गावातील/शहरी भागातील १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे नजिकच्या शाळेत समावेशन करणे.

१४.शासकीय धोरणाच्या निकषापेक्षा अधिक अंतरावर शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ने-आण व्यवस्थेसाठी धोरण करणे.

१५.Olympic-२०२० पदक पूर्ततेचे ध्येय गाठण्यासाठी कृती आरखडयाची अंमलबजावणी करणे.

१६.राज्यातील १००० प्रगत शाळांमधील १००% विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या सवयी रुजविणे.

१७.इयत्ता ११ वी व १२ वी साठी अभ्यासक्रम व मूल्यमापन NEET/JEE च्या धर्तीवर करणे.

१८. दिव्यांग मुलांसाठी विशेष उपक्रम राबविणे.

वरील KRA/उद्दिष्टांची पूर्तता करण्याच्या अनुषंगाने सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक व सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) यांना या परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येत आहेत की, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या अनुषंगाने योग्य ती नियोजनबध्द कार्यवाही करावी. तसेच याबाबतचा मासिक प्रगती अहवाल नियमितपणे आयुक्त (शिक्षण) यांना सादर करावा. आयुक्त, शिक्षण यांनी उपरोक्त उद्दिष्टांच्या अनुषंगाने जिल्हानिहाय आढावा वेळोवेळी घेऊन शासनास अहवाल सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७०९२५१५५४१९३८२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suryakant B. Patil

Digitally signed by Suryakant B. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1e4d61e2654004fd87056f70e5ae32fb1d62013750a34b063c53c71f673388b9, cn=Suryakant B. Patil
Date: 2017.09.25 15:55:52 +05'30'

(सु. ब. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. मा. अपर मुख्य सचिव, मा. मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
३. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. मा.आयुक्त (क्रीडा), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. मा.संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
७. मा.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, चर्नीरोड, मुंबई.
८. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे विशेष कार्य अधिकारी.
९. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. सह सचिव/उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१४. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक), सर्व शिक्षण निरिक्षक, मुंबई
१५. सर्व डायटचे प्राचार्य.

प्रत, निवड नस्ती, एसडी-६.